# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## पोलीस शिपाई भरती सन २०१८

## उमेदवारांना सुचना

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर " पोलीस शिपाई / बॅन्डस्मन " पदाची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आयोजित करण्यांत आलेल्या पोलीस भरती सन २०१८ ची लेखी परीक्षा दिनांक २८-०३-२०१८ रोजी घेण्यांत आली. लेखी परीक्षेचा निकाल याकार्यालयाचे व पोलीस मुख्यालय, अमरावती शहरचे नोटीस बोर्डवर आणि या कार्यालयाचे संकेतस्थळ www.amravaticitypolice.gov.in यावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत आलेला आहे.

लेखी परीक्षेच्या उत्तर पत्रिकेतील गुणांबद्दल निकाल जाहिर झाल्यानंतर कोणत्याही उमेदवाराने तक्रार केल्यास व उत्तरपत्रिकेची पुन:तपासणी करण्याची ४८ तासाचे आत मागणी केल्यास, ती स्वीकारण्यात येईल. उत्तरपत्रिका तपासणेकरिता पोलीस उपायुक्त (मुख्यालय), अमरावती शहर यांना प्राधिकृत करण्यांत आले आहे. उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करण्यासाठी उमेदवाराकडून रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) अतिरिक्त फी आकारण्यात येईल. फेरतपासणी करण्याची मागणी करणा-या उमेदवाराला प्रथम फी ची रक्कम याकार्यालयामध्ये रोखीने अथवा धनादेशाद्वारे भरणा करावी लागेल. उत्तरपत्रिकेच्या फेरतपासणी संबंधी पोलीस उपायुक्त (मुख्यालय), अमरावती शहर यांचा निर्णय अंतिम राहील. उत्तरपत्रिकेच्या फेरतपासणी संबंधी उमेदवाराने याकार्यालयामध्ये चौकशी करावी.

### *बॅन्डस्मन उमेदवारांना विशेष सुचना*

बॅन्डस्मन उमेदवारांच्या बाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक क्र.अपोमसं/पोशि भरती /सन २०१८/५०१/२०१७/५५९, दि. ३-२-२०१८ तरतुदीप्रमाणे बॅन्डस्मन उमेदवांना १०० गुणांच्या लेखी परीक्षेत प्राप्त झालेले गुण हे ७० गुणांच्या प्रमाणात विचारात घ्यावयाचे आहेत. अशाप्रकारे लेखी परीक्षेत प्राप्त झालेले गुण व प्रात्यक्षिक चाचणी मध्ये ३० गुणांपैकी मिळालेले गुण यांची बेरीज करुन

येणारी संख्या ही सदरहू बॅन्डस्मन उमेदवारास लेखी परीक्षेमध्ये १०० गुणांपैकी मिळालेले गुण म्हणून विचारात घेण्यात येईल. याबाबत सविस्तर गुणांची माहिती लवकरच बॅन्डस्मन उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत येईल हयाची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक २९-०३-२०१८
ठिकाण- अमरावती.

(दत्तात्रय मंडलिक)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

ooooo